पोलीस उप आयुक्त वाहतुक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/वाहतुक नियंत्रण अधिसुचना/ २३ /२०२३ दि. १३/०२/२०२३

## –: वाहतुक नियंत्रण अधिसुचना :–

**ज्याअर्थी,** ठाणेनगर वाहतुक उप विभागाच्या हददीत दि. १८/०२/२०२३ रोजी महाशिवरात्री निमित्त कौपीनेश्वर मंदिर,मुख्य बाजारपेठ या ठिकाणी सालाबाद प्रमाणे यावर्षी देखील महाशिवरात्रौ उत्सव साजरा होणार आहे. नमुद ठिकाणी मोठया प्रमाणात दर्शनासाठी भाविकांची गर्दी होत असते. त्या करीता सदर परिसरात वाहतुकीची कोंडी होवू नये, वाहतूक सुरळीत व सुनिश्चित होण्यासाठी आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी **डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंदी** :– जांभळी नाक्यापासुन सुभाषपथ मार्गे मुख्य बाजारपेठ मधुन ए वन फर्निचरकडे जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना जांभळी नाका येथे ' **प्रवेश बंद** ' करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग** :– सदरची वाहने **जांभळी नाका येथुन उजवीकडे वळण घेवुन टॉवरनाका मार्गे** इच्छित स्थळी जातील.

सदरची वाहतुक अधिसुचना दिनांक १८/०२/२०२३ रोजी सकाळी ०३.०० ते रात्रौ २३.०० वाजे पावेतो अंमलात राहिल.

सदरची अधिसुचना ही फायरब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागु होणार नाही.

**( डॉ. विनयकुमार मे. राठोड )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

– मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
– मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
– मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.
– मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.

**प्रत माहितीसाठी**

– प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
– पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१, ठाणे.
– पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
– परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
– विभाग नियंत्रण, राज्य परिवहन, ठाणे.
– नियंत्रण कक्ष, ठाणे शहर

CamScanner

– विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे

२/– सदरची अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,**

सहायक पोलीस आयुक्त, ठाणे वाहतूक विभाग, पो.नि. ठाणेनगर वाहतूक उपविभाग.

CamScanner